॥श्रीराम॥

PAGE No. (१)
DATE १२/१२/२०२१

## बोडण (कोकणस्थांच्यातील एक पारंपारिक प्रथा)

बोडण भरणे हा विधी कोकणस्थ लोकांच्यात करण्याचा आहे. हा एक पारंपारिक कुलधर्म म्हणुन मानला जातो. हे एक देवीचे कार्य आहे. सर्व कोकणस्थ लोकांच्यात ही पद्धत आहेच असे नाही. बहुतेकांकडे पूर्वापार चालू आहे म्हणून बोडण भरतात. कोणी मागून घेतलेली पूजा म्हणून, तर कोणाचा नवस म्हणुन अनेक कारणांनी बोडण भरतात. कुलधर्म / कुलाचार म्हणूनही बोडण भरण्याची प्रथा आहे. बोडण हे घरामध्ये कोणतेही शुभकार्य झाल्यास किंवा वर्षातून एकदा भरण्याची पद्धत आहे. घरामध्ये मुलगा किंवा मुलगी जन्मास आल्यावर त्याचे बारशाच्या वेळी बोडण भरतात. मुलांची मुंज झाल्यावर, लग्न झाल्यावरही बोडण भरतात. तसेच नवीन घर बांधल्यावर / फ्लॅट घेतल्यावर सुद्धा बोडण भरतात. भरण्याची प्रथा आहे.

बोडण भरण्यासाठी मंगळवार वा शुक्रवार असावा. प्रसंगी रविवार देखिल चालतो. मात्र त्या दिवशी एकादशी चतुर्थी / तसेच पौर्णिमा / अमावस्या असू नये. बोडण भरण्यासाठी चार सवाष्णी व एक कुमारिका अशा पाचजणी लागतात. सर्व सवाष्णी लेकुरवाळ्या असाव्यात. कुमारिकेचे येथे विशेष महत्व आहे. काहींच्याकडे सात सवाष्णी लागण्याची प्रथा आहे त्यांनी बाहेरच्या पाच, घरची एक व कुमारिका अशा सातजणी पूजेसाठी लागतात.

★ **पूजेची तयारी :-** चौरंग किंवा पाट, पितळेची मोठी परात, कणकेचे दिवे पाच, पाट-वरवंटा, पाच सवाष्णींचे पाच महानैवेद्य. हा महानैवेद्य पुरणवरणाचा लागतो. नेहमीप्रमाणे पंचामृत पूजेची तयारी, दक्षिणा, विड्याची पाने, सुपारी, देवीची मूर्ती, गौरीची लेणी, लुगडी (नवी - मंगळसूत्र, वेणी, हार, डेरा, चार कळस, जोडवी, विरोदी, फणी इ.) हे सर्व कणकेचे करतात.

★ **गौर बसविण्याची पद्धत :-** पाटाच्या किंवा चौरंगाच्या चार बाजूला चार कळस लावावेत. नंतर पाटवरवंट्यावर गौर बसवावी, पाठीमागे दुधाने भरलेला तांब्या ठेवावा. सवाष्णींना व कुमारिकेला आपल्या घरी न्हावयास घालावे. तसे जर जमले नाहीतर तेल व शिकेकाई प्रत्येकीला आमंत्रण देण्याच्या वेळी द्यावी. सर्वजणींनी न्हाऊन माखुन रेशमी वस्त्र नेसून पूजेला बसावे. कुमारिका ३ ते १० वर्षांपर्यंतची असावी. सवाष्णी व कुमारिका पूजेकरिता आपल्या घरी आल्या की प्रथम कोमट पाणी घेऊन त्यांच्या पायावर घालावे. नंतर पायावर दूध घालावे व पुन्हा गरम पाणी घालुन पाय स्वच्छ धुवावेत. पाय स्वच्छ कापडाने पुसुन दोन्ही पायावर हळद व कुंकवाची बोटे उमटावीत किंवा स्वस्तिक काढावे. कपाळाला हळदकुंकू लावावे. तुळशीची पूजा करुन घरच्या सवाष्णीने तुळशीची ओटी भरावी व मग नंतर सर्व सवाष्णींची ओटी भरावी.

★ **पूजा :-** बोडण भरावयास बसताना घरच्या सवाष्णीचे तोंड पूर्व दिशेला असावे व तिने आपल्या उजव्या हाताला कुमारिकेस बसवावे. प्रथम पितळेच्या परातीमध्ये सुपारीच्या गणपतीची पूजा करावी. देवीला कोमट पाण्याने स्नान घालावे. तिला हळद कुंकू लावावे. देवीची यथासांग पूजा करावी. नंतर बोडण कालवावयास सुरवात करावी. बोडण कालवत असताना जेवढेरा स्तोत्र म्हणावे. स्तोत्र संपेपर्यंत कालवत रहावे. कालवलेल्या महानैवेद्यात दही, पैसा, गणपतीच्या पूजेची सुपारी विडा वगैरे घालून देवीला खेळवावे. बोडणाचे नैवेद्य करताना छोट्या छोट्या पाच मुटकुळ्या करुन त्या केळीच्या पानावर ठेवाव्यात. नंतर त्यावर इतर पदार्थ वाढावेत. महानैवेद्य एकत्र कालवावेत. व वरुन सवाष्णींनी किंवा घरच्या पुरुषाने दुधाची, दह्याची, तुपाची, मधाची व साखरेची एक एक धार सोडावी. एखाद्या वेळी एखाद्या सवाष्णीच्या अंगात येते.


या कुळाचारात कुमारिकेचे फार महत्त्व असते. तिला तू तृप्त झालीस काय? असे विचारतात. ती तृप्त झाल्यावर बोडण कालवणे व पंचामृत घालणे बंद करावे. कुमारिकेने बोडण कालवत असताना बोडणात पैसा, सुपारी व अन्नपूर्णा देवी गृहस्वामिनीने जवळ धरा- वेत. झाल्यावर सवाष्णींनी इतर कोठेही हात न धुता प्रथम पुरणाने हात पुसावेत. नंतर साध्या पाण्याने हात धुवून ते पाणी बोडणात घालावे. नंतर गोरीला पुरण लावून स्वच्छ पुसून अवस्थित जागेवर बसवावे. तिला हळद कुंकू लावून नेहमीप्रमाणे पूजा करून महानैवेद्य दाखवावा. देवीला पंचामृताने स्नान घातल्यावर जे तीर्थ असते ते थोडेसे बाजूला काढून तो अंगारा म्हणून सर्वांनी कपाळावर लावावा. नंतर सवाष्णींना व कुमारिकेला भोजनास बसण्यास सांगून सोना मनसोक्त जेवू घालून झाल्यावर सर्व सवाष्णींची व कुमारिकेची ओटी, खण व नारळाने भरावी. सर्व करणे शक्य नसल्यास निदान सवाष्णींची ओटी भरून कुमारिकेची नारळाने ओटी भरावी. नैवेद्य मांडताना पाच बोडणांचे, एक घरच्या देवाचा व एक कुमारिकेचा असे नैवेद्य वाढावेत. तसेच वास्तुरूप व गोग्रास असेही नैवेद्य दाखवावेत.

## बोडणाचा स्वयंपाक

बोडणाच्या दिवशी मुख्य स्वयंपाक वरण-भात, भाजी, पुरणपोळी, तळण खीर-पुरण व बाकीचा स्वयंपाक इतर सणांप्रमाणे करावा.

सोबत बोडणाची रांगोळी zerox जोडली आहे.

नमस्कार!-




शुभास्तु,

सौ. अनघा आपटे
९१५६३९४८९७